18 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉलेजमध्ये दोनदा प्रवेश राबवू, सुविधाही वाढवा

## शासन, विद्यापीठाकडे प्राचार्यांची मागणी; वेळापत्रक निश्चिती, तासिकांच्या नियोजनाची कसरत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : विद्यार्थी हित पाहता वर्षातून दोनदा प्रवेश देण्याचा निर्णय चांगला आहे. या निर्णयानुसार आम्ही कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविण्यास तयार आहोत, पण परीक्षांची वाढणारी संख्या आणि त्याअनुषंगाने लागणाऱ्या सुविधा शासन आणि शिवाजी विद्यापीठाने वाढवाव्यात, अशी मागणी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील प्राचार्यांनी केली आहे. वेळापत्रक निश्चिती, तासिका आणि ऑड सेमिस्टर घेणे, आदी स्वरूपातील नियोजनाचे आव्हान पेलताना कॉलेज प्रशासनाला कसरत करावी लागणार आहे.



विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) देशातील विद्यापीठ, महाविद्यालय, शैक्षणिक संस्थांना वर्षातून दोनदा प्रवेश प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिली आहे. त्यात प्रवेशाचा पहिला टप्पा जुलै-ऑगस्ट, तर दुसरा टप्पा जानेवारी-फेब्रुवारीमध्ये घेण्याबाबतही सुचविले आहे.

निकालातील विलंब, आजारपण अथवा इतर काही वैयक्तिक कारणामुळे ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येत नव्हता. अशा विद्यार्थ्यांची युजीसीच्या दोनदा प्रवेशाच्या निर्णयाचा मोठा उपयोग होणार आहे. ते विद्यार्थी हिताच्यादृष्टीने चांगले आहे. मात्र, या निर्णयामुळे परीक्षांची संख्या वाढणार आहे. दुसऱ्यांदा प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तासिका घेणे, त्यांची बैठक व्यवस्था, परीक्षा घेणे, आदी स्वरूपातील काम दोनवेळा करावे लागणार आहे. याबाबत कॉलेज पातळीवरील सध्याच्या सुविधांच्या क्षमता, मनुष्यबळही वाढवावे लागणार आहे.

> निर्णय चांगला असला, तरी त्यानुसार प्रत्यक्षात कार्यवाही करताना कॉलेजची कसरत होणार आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने कॉलेजला मदत करावी. मनुष्यबळ, पायाभूत सुविधा वाढवाव्यात.
>
> **-डॉ. व्ही. एम. पाटील,**
> सचिव, शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

> या निर्णयाची सर्व महाविद्यालयांमध्ये अंमलबजावणी करताना त्यात एकसूत्रीपणा राहील, यादृष्टीने शासन आणि विद्यापीठाने संयुक्तपणे निर्णय घ्यावा. महाविद्यालयांसमोरील अडचणी सोडविण्यात याव्यात.
>
> **-डॉ. डी. जी. कणसे,** अध्यक्ष, सांगली जिल्हा प्राचार्य असोसिएशन

> दोनदा प्रवेश प्रक्रिया स्वीकारल्यानंतर परीक्षा, ऑड सेमिस्टरची संख्या वाढणार आहे. त्याचा विचार करून योग्य असे धोरण विद्यापीठाने निश्चित करून याबाबत पुढे जाणे आवश्यक आहे.
>
> **-डॉ. आर. व्ही. शेजवळ,**
> प्राचार्य, एलबीएस कॉलेज, सातारा

### विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सध्याचे चित्र

- जून ते ऑगस्टदरम्यान प्रवेश प्रक्रिया राबविली जाते.
- दरवर्षी विविध अभ्यासक्रमांचे दोन लाख ५० हजार विद्यार्थी शिक्षण घेतात.
- हिवाळी, उन्हाळी सत्रांत सुमारे १३०० परीक्षा होतात.
- सुमारे प्रत्येक सत्रात साधारणतः दोन लाख विद्यार्थी परीक्षा देतात.
- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांची संख्या २७६ इतकी आहे.

### विद्यापीठाला नियम बदलावे लागणार

- वर्षातून दोनवेळा प्रवेश प्रक्रिया राबविणे विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे. याबाबत शिवाजी विद्यापीठ सकारात्मक आहे. प्रवेशाबाबतचे सध्याचे नियम, परिनियमांमध्ये विद्यापीठाला बदल करावा लागणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JUN 2024
तरूण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी विभागातून निवड झालेले विद्यार्थी व सोबत शिक्षक.

# विद्यापीठाच्या २९ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्थापत्य (सिव्हिल) अभियांत्रिकी विभागामधून २९ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. तंत्रज्ञान अधिविभागामध्ये विविध शाखांसाठी प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले होते. या माध्यमातून विद्यार्थांची निवड झाली.

अदानी सिमेंट कंपनीने तन्मय गिर्हे, हर्षद केंगले, बाबासाहेब गलबे, शाम पाटील, या विद्यार्थ्यांची 'टेकनिकल इंजिनिअर' पदावर निवड केली आहे. स्कॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने ममता जाधव, दिव्या भगरे, साक्षी सुपाने, ऋतुराज फल्ले, ऋषिकेश वेखंडे, शिवकुमार माने, याना 'डिझाईन इंजिनिअर' पदावर नियुक्त केले आहे. केनेस्ट मॅनुफॅक्चरर प्रा. लि. यांनी ओंकार कटके याची एक्सिक्युशन इंजिनिअरपदी निवड केली आहे. आर.डी.सी. कॉंक्रिट या कंपनीने एस. माने ट्रेनी इंजिनिअर म्हणून निवड केली आहे.

टोटल टेक प्रा.लि. या कंपनीने सिव्हिल विभागातून १६ विद्यार्थ्यांची प्रोजेक्ट इंजिनिअर म्हणून नेमणूक केलेली आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली, शिवाजी विद्यापीठ प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी डॉ. राजन पडवळ, तंत्रज्ञान विभागाचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. गणेश पाटील, स्थापत्य विभाग प्रमुख प्रा.महेश साळुंखे व त्यांचे सहकारी प्राध्यापक, प्रा. वैभव कांबळे व प्रा. अनिकेत रेणावीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

18 JUN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्याचे 'कौशल्य' धोरण लवकरच

## १४ जणांची समिती ; शिवाजी विद्यापीठ कुलगुरूंचाही समितीत समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात उद्योग धंद्यांसाठी पूरक आणि कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, राज्यातील तरुणांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, त्यातून रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधी निर्माण व्हाव्यात, याकरिता राज्य शासन कौशल्य धोरण तयार करत आहे. या धोरणाचा मसुदा तयार करण्यासाठी राज्य शासनाने १४ जणांची समिती स्थापन केली आहे. या समितीत शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूंचा समावेश करण्यात आला आहे.

राज्यात २०१५ साली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता हा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला. या विभागांतर्गत कौशल्य विकासाच्या कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. तरुणांना रोजगारांच्या संधी निर्माण व्हाव्यात, याकरिता त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण उपलब्ध व्हावे, त्याद्वारे त्या-त्या क्षेत्रातील कौशल्य त्यांच्या अंगी यावे, याकरिता २०१५ पासून प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानही राबविले जात आहे. उच्च कौशल्यासाठी कौशल्य विद्यापीठही स्थापन करण्यात आले आहे.

### यावर आधारित असेल कौशल्य धोरण

- कालसुसंगत कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्मिती
- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता परिसंस्थेचा विकास
- आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य अद्ययावत धोरणांचा विचार
- पर्यावरण विकासाशी पूरक; लिंग समानतेवर आधारित

राज्यातील सर्व विभागांतील कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमात एकसूत्रीपणा असावा, कालानुरूप कौशल्य प्रशिक्षणाची आणखी प्रभावी अंमलबजावणी व्हावी, याकरिता आता राज्याचे कौशल्य धोरण निश्चित केले जाणार आहे. याकरिता कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. यामध्ये सार्वजनिक कौशल्य विद्यापीठ, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या कुलगुरूंचा सदस्य म्हणून समावेश केला आहे.

कोल्हापूर जिल्ह्याला औद्योगिक परंपरा आहे. याखेरीज कौशल्य विकासासाठी शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातूनही विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. यासर्व पार्श्वभूमीवर या समितीत शिवाजी विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या झालेल्या समावेशाने राज्याचे कौशल्य धोरण कालसुसंगत, कौशल्ययुक्त मनुष्यबळाची निर्मिती होण्यासाठी पूरक ठरेल, असा विश्वास आहे.